


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २५३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२५ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## मुलं चार जन्माला घाला, पण एक RSS ला द्या बागेश्वर बाबांचं वक्तव्य...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, नागपूर :** बागेश्वर बाबा उर्फ धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी नागपूर येथे भारतदुर्गा शक्तिस्थळाचा शिलान्यास सम ारंभात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कामांचं कौतुक केलं. संघाचं कौतुक करत असताना बागेश्वर बाबांनी केलेल्या एका वक्तव्याची सध्या चर्चा होत आहे. 'मुलं चार जन्माला घाला, पण एक ठडड द्या', असं वक्तव्य बागेश्वर बाबांनी केलं आहे. याचवेळी भाषणात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी देखील वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. दरम्यान, त्यांनी नागपुरात निर्माण होत असलेल्या भारतमाता दुर्गामाता मंदिराबाबत आनंद व्यक्त केला.

आपल्या मनात जो संकल्प आला, भारतमाता दुर्गामाताच्या मंदिराचा संकल्प आहे. आम्ही मागे बसलो होतो तेव्हा एकजण सांगत होतं की, आपल्या मनात कल्पना आली की, लोकांना वाटत असेल की कल्पना आली. पण माझ्या मते भारतमातानेच हे निवडलं असेल की, असं व्हावं. आमचे गौरव पुन्हा स्थापन व्हावं आणि त्याचे निमित्त आपण व्हावं, असं बागेश्वर बाबा सरसंघचालक मोहन भागवत यांना उद्देशून म्हणाले.

आम्हाला वाटतं की, इथल्या देवशक्तीने हा विचार केला आहे. इथल्या कणाकणाने हा विचार केला आहे. संपूर्ण जगात आपल्या भारतातच भारत माता की जय म्हटलं जातं. आपला देश एकमेव असा आहे जिथे भारत माता की जय म्हटलं जातं. पूर्ण जगतात स्त्रियांना उपभोगण्याची वस्तू मानले जाते पण आमच्या भारत देशात मातांना पुज्य मानले जाते. असा आहे आमचा भारत. या भारताच्या गौरवाला पुन्हा विस्थापित करण्यासाठी संघचालक मोहन भागवतजी आपण जो संकल्प केला, आपला भारत आता नवा इतिहास रचणार आहे, असं ते म्हणाले.

आमचा भारत पुन्हा देवशक्तीकडे जात आहेत. जेव्हा भारताचे लोक नागपुरात कॅन्सर इन्स्टीट्यूटच्या प्रांगणात दुर्गामाता मंदिरचे दर्शन घेतील, ज्यांच्या बुजांम ध्ये अस्त्र-शस्त्र आहे. तेव्हा भारताचे लोक जाणतील की, भारत शास्त्र आणि शस्त्रने चालतो. आमच्या भाषेत माला आणि भाला म्हणतात. आमच्या देवी-देवतांच्या हातात अस्त्र आणि शस्त्रदेखील आहे. त्यामुळे बनसी वाजवल्याने काम चाललं असतं तर महाभारत का झालं असतं? भारतमाता दुर्गामाताच्या या मंदिर निर्माणाच्या संकल्पनेचे आम्ही खूप आनंदी आहोत. आपल्या आरोग्यासाठी प्रार्थना करत आहोत. आपण निरोगी राहवं, यापेक्षा मोठे संकल्प आपल्या हातून पूर्ण होवोत. भारत भगवामय आणि सनातनमय राहावा. आपल्यादेखल अखंड भारताच्या दिशेला आपण जावो, अशी प्रार्थना करतो, असं बागेश्वर बाबा म्हणाले. सर्व संतजणांना पुन्हा प्रमाण करतो. जेव्हा मोठे बसलेले असतात तेव्हा कमी बोलायला हवं. मोठमोठे सूर्य बसले आहेत. आम्ही तर छोटे-मोठे दीपक आहोत. जास्त बोललो तर पुढच्यावेळी पत्ता साफ होईल. जास्त बोलतो तर त्याला साईडला करा. हा कामाचा नाही. त्यामुळे वडिलधाऱ्यांसोबत कमी बोलावं, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

**बागेश्वर बाबांचं भारताला आवाहन**

मी भारताला एक गोष्ट सांगू इच्छितो, जेव्हा संपूर्ण भारतात कुठेही संकट आलं तर लोक जीव वाचवण्यासाठी पळतात. पण आमचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक-एक कार्यकर्ता जीव वाचवून पळत नाही तर तिथे जावून अनेकांचे प्राण वाचवतो. हा आहे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ. मी पूर्ण भारताला प्रार्थना करतो, मुलं चार जन्माला घाला, पण एक स्वयंसेवक संघाला द्या, जेणेकरुन दुसऱ्याला वाचवायला कामी येईल, असं वक्तव्य बागेश्वर बाबा उर्फ धीरेंद्र शास्त्री यांनी केलं.

## पूर्व वैमनस्यातून पुण्यात पुन्हा गोळीबाराची घटना

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, पुणे :** पुण्यातून धक्कादायक घटना समोर आली आहे. पुण्यात गुन्हेगारी काही केल्या गुन्हेगारी कमी होताना दिसत नाही. पुण्यात गोळीबार, गँगवॉर सातत्याने होताना दिसतो. आतादेखील पुण्यात गोळीबाराची धक्कादायक घटना समोर आली आहे. एका सलूनमध्ये ही गोळीबाराची घटना घडली आहे. या घटनेत एका व्यक्तीच्या कानाला गोळी लागली आहे. तर दोन जण जखमी झाल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे वारजेत अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी ही घटना घडली आहे. त्यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली.



पुण्यातील वारजे परिसरात शुक्रवारी (२४ एप्रिल) सायंकाळी एक धक्कादायक आणि थरारक घटना घडली आहे. चैतन्य चौकातील एका सलूनमध्ये अचानक गोळीबार झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. साधारण संध्याकाळी ६:४० वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे सलूनमध्ये उपस्थित नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं. मिळालेल्या माहितीनुसार, निहाल शिंदे हा सलूनमध्ये केस कापत असताना काही आरोपी तिथे दाखल झाले आणि अचानक वादातून झटापट सुरू झाली. या झटापटीदरम्यान गोळीबार करण्यात आला. या हल्ल्यात केस कापण्यासाठी बसलेला निहाल शिंदे याच्या डाव्या कानाला गोळी लागून गंभीर जखमी झाला आहे. त्याचबरोबर सलूनमध्ये उपस्थित असलेला अमोल आढाव हाही या गोंधळात जखमी झाला आहे.

**१ आरोपी ताब्यात, ४ जण फरार**

घटनेनंतर परिसरात तात्काळ गोंधळ उडाला, नागरिकांनी आरडाओरडा करत सुरक्षिततेसाठी पळ काढला. म ात्र, या दरम्यान पोलीस दलाच्या डीबी पथकाने जलद हालचाल करत कारवाई केली. गस्तीदरम्यान घटनास्थळीच साहिल राऊत या एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या या तत्परतेमुळे पुढील मोठा अनर्थ टळल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणात एकूण पाच आरोपींची ओळख पटली असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

**पूर्व वैमनस्यातून गोळीबार केल्याचे स्पष्ट...**

प्राथमिक तपासात ही घटना जुन्या वैमनस्यातून घडल्याचे स्पष्ट झाले आहे. निहाल शिंदे आणि आरोपी यांच्यात जानेवारी २०२३ मध्ये घडलेल्या एका गुन्ह्याशी संबंधित वाद असल्याची माहिती समोर आली आहे. त्याच जुन्या वादाचा राग मनात धरून हा हल्ला करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. सध्या परिसरात तणावपूर्ण शांतता असून पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पुढील तपास वारजे पोलिसांकडून सुरू आहे. तपासात अधिक बाबी काय सम ोर येतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मी मराठी बोलतो, या माझ्या रिक्षात बसा!

### मराठी सक्तीच्या वादात मुंबईत सर्वत्र या पोस्टरची चर्चा

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२४, मुंबई :** रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी राज्य सरकारने घेतलेल्या 'मराठी सक्ती'च्या निर्णयाला आता प्रत्यक्ष जमिनीवर पाठिंबा मि ळताना दिसत आहे. १ मेपासून कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या निर्णयाच्या समर्थनार्थ कंबर कसली असून, अंधेरी पश्चिम भागात मनसेच्या वतीने रिक्षांवर विशेष स्टिकर्स लावण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे समोर आले आहे.

मनसेचे अंधेरी पश्चिम विभाग अध्यक्ष मनीष धुरी आणि म.न.वि.से. (महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना) उपाध्यक्ष कुशल धुरी यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत अंधेरी परिसरातील रिक्षांवर मनसेचे अधिकृत स्टिकर्स लावून 'मराठी'चे समर्थन केले जात आहे.

या मोहिमेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे रिक्षांच्या मागील बाजूस लावण्यात आलेले स्टिकर्स. या स्टिकरवर अतिशय स्पष्ट आणि ठळक शब्दांत संदेश देण्यात आला आहे. मी मराठी बोलतो, मला मराठी समजते, या माझ्या रिक्षात बसा! हा संदेश प्रवाशांना आकर्षित करण्यासोबतच, मराठी भाषेचा अभिमान बाळगणाऱ्या चालकांना प्रोत्साहन देण्यासाठी लावण्यात आला आहे. काही अम राठी रिक्षा संघटनांनी मराठी सक्तीच्या निर्णयाला विरोध दर्शवला असताना,




मनसेच्या या पावलामुळे मराठी भाषिक रिक्षा चालकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. मनीष धुरी आणि कुशल धुरी यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्रात रिक्षा चालवायची असेल तर इथली भाषा येणे अनिवार्य आहे आणि जे चालक मराठी बोलतात, त्यांना प्रवाशांनी प्राधान्य द्यावे हाच या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

अंधेरी पश्चिम हा मुंबईतील गजबजलेला भाग आहे. येथे अनेकदा परप्रांतीय चालकांशी संवाद साधताना प्रवाशांना भाषेची अडचण येते. अशा परिस्थितीत मराठी येते असे फलक लावलेल्या रिक्षांना प्रवाशांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. म नसेच्या या 'स्टिकर' मोहिमेमुळे आता मुंबईत 'मराठी विरुद्ध अमराठी' हा वाद पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

## महाराष्ट्र शासनाचे अपर सचिव विकास खारगेंना आझाद हिंदचे निवेदन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, बुलडाणा :** जिल्ह्यातील बळीराजा पांदण रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा. बुलढाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांच्या उत्कृष्ट कार्याचा गौरव शासन प्रशासनाने करावा. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेली तीस दिवसाच्या सक्तीच्या रजेची कारवाई तत्काळ प्रभावाने मागे घ्यावी.

यासह जिल्ह्यातील महसूल विभागाच्या अनुषंगाने विविध म ागण्यांचे निवेदन आज मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना ई-मेलद्वारे तर महाराष्ट्र शासनाचे महसूल विभागाचे अपर सचिव विकास खारगे यांना जिल्हाधिकारी यांच्या दालनात २४ एप्रिल ला प्रत्यक्ष भेटून चर्चा करीत निवेदन देण्यात आले.

**आझाद हिंदच्या रास्त मागण्यांची त्वरित पूर्तता होईल : विकास खारगे**

चर्चे दरम्यान आझाद हिंद च्या निवेदन मागणीची दखल घेतल्या जाईल. बळीराजा फांद्यान रस्ता, निधी, उत्कृष्ट अधिकाऱ्यांचा सन्मान,



अधिकारावर झालेली चुकीची कारवाई यासह निवेदनातील मागण्यांची पूर्तता करण्यासाठी स्वतः पुढाकार घेईल असे आश्वासन सुद्धा यावेळी अपर सचिव विकास खारगे यांनी दिले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. देवरे, पोलीसअधीक्षक डॉ.निलेश तांबे यांच्यासह जिल्ह्यातील सर्वच वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

निवेदन देतेवेळी आझाद हिंद शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. सतीशचंद्र रोठे पाटील, विजय साबळे पाटील, राम व्यवहारे, वारकरी धर्म परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष वासुदेव महाराज शास्त्री, महिला संघटनेच्या प्रदेशाध्यक्ष सुरेखाताई निकाळजे, रमाई ब्रिगेडच्या भारतीताई अवचार,ग्राम स्वराज्य समितीचे कमलाकर व्यवहारे, सिद्धार्थ वानखेडे,अशोक बाहेकर, राष्ट्रीय बजरंग दलाचे सुशांत पाटील, भूपेश पाटील आदींची यावेळी उपस्थिती होती.

## 'प्रकाश आंबी यांच्या आई आणि पत्नीबद्दल जे बोललो...'

### संजय गायकवाड यांच्याकडून अखेर दिलगिरी व्यक्त

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, बुलडाणा :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आम दार संजय गायकवाड यांनी अखेर आज दिलगिरी व्यक्त केली आहे. संजय गायकवाड यांनी 'कोण होता शिवाजी?' पुस्तकाचे प्रकाशक प्रकाश आंबी यांना फोन करुन अश्लील भाषेत शिवीगाळ आणि धमकी दिली होती. संजय गायकवाड यांनी अतिशय अर्वाच्या भाषेत प्रकाश आंबी यांना फोनवर दमदाटी केली होती. त्यांच्या फोनवरील संभाषणाची ऑडिओ क्लिप सर्वत्र व्हायरल झाली होती. या प्रकरणावरुन संजय गायकवाड यांच्यावर चौफेर टीकेची झोड उठल्यानंतर त्यांनी आपल्या कृत्यावर दिलगिरी व्यक्त केली आहे.

संजय गायकवाड नेमकं काय म्हणाले?

प्रकाश आंबी यांचं प्रकाशन झालेलं शिवाजी कोण होता? हे पुस्तक, ज्याच्यावर गोविंद पानसरे यांचा उल्लेख केला आहे, पण त्यांचा लेखक म्हणून उल्लेख नाही. त्या पुस्तकाच्या



संदर्भात मी प्रकाश आंबी यांना फोन करुन प्रकाश भाऊ आपण हे पुस्तक प्रकाशित केलं आहे का? इथून मी सुरुवात केली, असं संजय गायकवाड सुरुवातीला म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराज हे करोडो देशवासीयांचे दैवत आहेत. त्यांना आपण सर्वजण दैवत मानतो. त्यांचा उल्लेख करताना श्री छत्रपती शिवाजी महाराज असा उल्लेख केला जातो. यापूर्वीसुद्धा मी विधानसभेत राज्यातील जेवढ्या संस्था आहेत, त्यांचे नाव शिवाजी असेल त्याऐवजी छत्रपती शिवाजी महाराज असं मानकरण करण्याची आग्रही मागणी केली आहे. शिवाजी शिक्षण संस्थेचं नाव बदलताना सुद्धा मी त्यांना सांगितलं की, छत्रपती शिवाजी महाराज असं नामकरण करावं. शिवरायांचा अपमान करु नये, अशी भूमिका त्यांनी मांडली.

**दिलगिरी व्यक्त करताना नेमकं काय म्हणाले?**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने जगणारे आम्ही लोकं आहोत. त्यांच्या नावाने मरणारी आम्ही लोकं आहोत. त्यामुळे आम्ही पदोपदी त्यांचा अपमान सहन करणार नाहीत. या पुस्तकात कमीत कमी ५०० ते ७०० वेळा शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख केला आहे. काही ठिकाणी तर शिवाजी महाराज मराठा वंशाचे नव्हते असंदेखील आहे. काही आणखी आक्षेपार्ह आहे. मला त्या पुस्तकाबद्दल काही आक्षेप नाही. ज्याने कुणी ते पुस्तक प्रकाशित केलं आहे त्याने छत्रपती शिवाजी म हाराज यांचा सन्मान करावा. मी त्यांना जे काही रात्री शिवीगाळ केली, त्यांच्या आईबद्दल किंवा पत्नीबद्दल बोललो असेल, त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो, अशा शब्दांत संजय गायकवाड यांनी दिलगिरी व्यक्त केली.




# लोकसंख्या वाढीनुसार लोकसभा सदस्य संख्या वाढविण्याचे सरकारला सुचले, तर लोकसंख्ये वाढीनुसार रोजगार निर्मिती का सुचली नाही?

देशात पाच राज्यात विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आणि याबद्दल आदर्श आचारसंहिता ३ मे पर्यंत आहे.अशा परिस्थितीत सरकारने अचानक विशेष अधिवेशन बोलावून त्यावर महिला आरक्षण, मतदारसंघ पुनर्रचना आणि मतदारसंघ पुनर्रचना आयोग विधेयक यासाठी विशेष अधिवेशन बोलाविण्यात आले होते.परंतू या विशेष अधिवेशनाचा मुख्य उद्देश म्हणजे २० सप्टेंबर २०२३ चे विधेयक बाजूला सारून लोकसभा सदस्यांची संख्या ८५० करने व त्यातून महिलांना ३३ टक्के आरक्षण देणे हा डाव सरकारचा होता.परंतु सरकारचा लोकसभा सदस्य संख्या वाढविण्याचा डाव फसला आणि विधेयक नामंजूर झाले.यामुळे सत्ताधारी पक्ष आगबबुला होवून वाटेल तसे वक्तव्य करतांना दिसतात.

विधेयक नामंजूर होताच सरकारची संपूर्ण टीम विरोधाकांवर टीकास्त्र झाडू लागले.यात दिग्गज नेते बोलतांना म्हणतात,विरोधकांनी केली महिला आरक्षणाची भ्रूणहत्या, विरोधकांना पापाची शिक्षा भोगावी लागेल, विरोधकांनी चिरडली महिलांची स्वप्ने, महिलांच्या मार्गात अडथळा अशा प्रकारे अनेक वक्तव्ये सत्ताधारी पक्षाचे नेते करीत आहे व केले सुध्दा. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणावी लागेल की, महिला आरक्षणाची एवढीच चिंता सरकारला होती तर,२०२३ मध्ये मंजूर झालेल्या महिला आरक्षण विधेयकाची अंमलबजावणी या विशेष अधिवेशनात का केली नाही? असाही प्रश्न उपस्थित होतो.यावरून स्पष्ट होते की सरकारला ५४३ लोकसभा सदस्यांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण द्यायचेच नव्हते.त्यामुळे सरकारने २०२३ चे विधेयक मोडीत काढून नवीन विधेयक आणल्याचे स्पष्ट झाले आहे.यामध्ये विरोधकांना दोष देणे म्हणजे आपल्याच पायावर कुह्राड मारल्या सारखे होईल.सरकारला महिला आरक्षणाची एवढीच चिंता आणि काळजी होती तर पाच राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत सरकारने आपल्या पक्षाकडून ३३ टक्के महिलांना उमेदवारी का दिली नाही? यावरून स्पष्ट होते की, सरकारने आणलेले महिला आरक्षण विधेयक चुकीच्या पद्धतीने सादर केले आणि याचा अभूतपूर्व धक्का भाजपला बसल्याचे दिसून येते.त्यामुळे दिग्गज नेते आगबबुला होवून वाटेल तसे वक्तव्य करतांना दिसतात.यावरून स्पष्ट होते की, देशात राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी काहीही करायला तयार असतात ही नुकताच झालेल्या



तिन दिवसांच्या विशेष अधिवेशनावरून लक्षात येते.देशात लोकसभेच्या ५४३ सीटा आहेत.या अनुषंगाने महिला विधेयक २० सप्टेंबर २०२३ ला मंजूर झाले.२१ सप्टेंबर २०२३ ला राज्यसभेत मंजूर झाले यानंतर २८ सप्टेंबर २०२३ ला राष्ट्रपतींनी मंजुरी दिली.

फक्त अंमलबजावणी करणे बाकी होते,एवढे सर्व झाल्यानंतर आता महिला विधेयक आणण्याची का गरज भासली? या मागचा सरकारचा एकच उद्देश असावा,जर ५४३ लोकसभा सदस्यांमधुन जर ३३ टक्के महिलांना आरक्षण दिले तर राजकीय पुढाऱ्यांचे देउळ पाण्यात जाईल व आपले वर्चस्व कमी होईल आणि आपल्या पायाखालची वाळू हळूहळू घसरू शकते या भितीने संसदेचे विशेष अधिवेशन बोलाविण्यात आले असल्याचे दिसून येते.हे अधिवेशन १६ एप्रिल ते १८ एप्रिल २०२६ दरम्यान बोलाविलेले या विशेष तिन दिवसीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने महिला आरक्षण, मतदारसंघ पुनर्रचना आणि मतदारसंघ पुनर्रचना आयोग विधेयक सादर केले.यावर मोठ्या प्रमाणात तिन दिवस चर्चा झाली, करोडो रुपयांचा चुराडा झाला व मतदान झालेयात विधेयकाच्या बाजूने कमी मते पडल्याने हे विधेयक नामंजूर झाले.या पार्श्वभूमीवर देशातील सत्ताधारी पक्षाने विरोधकांचे उखाडेपाखाडे काढायला सुरुवात केली. हे विधेयक नामंजूर होताच सत्ताधारी पक्षाचे दिग्गज नेते आपली राजकीय पोळी शेकण्यासाठी मैदानात उतरले आणि याचा फायदा पश्चिम बंगालच्या निवडणुकीत कसा घेता येईल यावर सरकारने जास्त भर दिला.१३१ वे घटनादुरुस्ती विधेयक २०२६ मध्ये एकूण जागांची संख्या वाढवून ८५० करण्याच्या तरतुदींचा समावेश होता.महिला आरक्षणाच्या नावाखाली लोकसभा सदस्याची ५४३ वरून ८५० संख्या करने होता,परंतु याकरिता प्रथम जनगणना होणे गरजेचे असते.परंतु जनगणना झालीच नाही, तर लोकसभा सदस्यांची संख्या कशी काय वाढणार हा ही प्रश्न उपस्थित होतो.देशात लोकसभा सदस्यांची संख्या वाढली तर राज्यसभा सदस्यांची संख्या वाढेल.यानंतर देशातील प्रत्येक राज्यात विधानसभा सदस्यांची संख्या वाढेल, विधानसभा सदस्यांची संख्या वाढली की विधानपरिषदेच्या सदस्यांची संख्या वाढेल.म्हणजे या वाढीव सदस्यांचा अरबो रूपयांचा बोजा देशाच्या १४० कोटी जनतेवर पडेल याचा विचार सरकारने केलाच नाही.माझ्या माहितीनुसार देशात लोकसभा सदस्यांची संख्या वाढविण्याची काहीही आवश्यकता नाही. कारण देशात ५४३ लोकसभा खासदार आहेत ,त्याचप्रमाणे २४५ राज्यसभा खासदार आहेत.या व्यतीरिक्त देशात प्रत्येक राज्यात विधानसभा आहेत तेथील विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य आहेत. सोबतच देशाच्या प्रत्येक राज्यांच्या शहरांमध्ये महानगरपालिका आहेत तेथील नगरसेवक, त्याचप्रमाणे देशातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा परिषदा आहेत तेथील सदस्य,या व्यतिरिक्त ग्राम पंचायत, नगरपालिका, सरपंच इतर अनेक सदस्य देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून जनतेने निवडून दिलेले आहेत.येवढा मोठा फौजफाटा देशसेवेसाठी असतांना खासदारांची संख्या वाढविण्याची सरकारला गरज का पडावी?आज जर देशात खासदारांची संख्या वाढली तर त्यांचा पगार, पेंशन, भत्ते हा खर्च महिन्याला करोडोंनी वाढेल हाच पैसा सरकारने देशाच्या विकासासाठी, बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी,महागाई कमी करण्यासाठी , शेतकऱ्यांना सुखसुविधा देण्यासाठी केला तर देशाचा विकास झपाट्याने होईल.सरकार म्हणते की, लोकसंख्या वाढीनुसार लोकसभा सदस्यांची संख्या वाढविणे गरजेचे आहे ही बाब ठीक आहे,तर याच अणूषंगाणे सरकारने लोकसंख्येनुसार वाढत्या बेरोजगारीचा विचार का करीत नाही?आज लोकसंख्येच्या तुलनेत देशातील प्रत्येक सरकारी विभागात कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहे यामुळे कामामध्ये अनेक अडचणी येत आहेत.याकडे सरकारचे लक्ष नसल्याने देशात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे, शेतकरी आत्महत्यां करीत आहे याचा विचार सरकार का करीत नाही?आज महागाईने सर्व सिमारेषा ओलांडल्या आहेत त्यावर सरकार नियंत्रण आण्यात अपयशी ठरत आहे. आज देशाच्या एक कोटी ईपीएस -९५ पेन्शन धारक गेल्या १२ वर्षांपासून वाढीव पेन्शनसाठी संघर्ष करीत आहे.वृध्द पेन्शन धारकांना फक्त किमान पेन्शन १००० मिळत आहे, ती कमीत कमी ७५०० करण्यासाठी वृध्द पेंशनधारकांची धडपड सुरू आहे परंतु सरकार याकडे लक्ष देण्यास तयार नाही.त्यामुळे अल्पशा पेंशनमध्ये ईपीएस पेन्शन धारक आज जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही अशी गंभीर परिस्थिती देशाच्या वृद्धांची आहे.जेव्हा स्वतःच्या स्वार्थाची गोष्ट आली तेव्हा सरकारने विशेष अधिवेशन बोलावले. परंतु सरकारचा हाही डाव फसला.सर्वप्रथम प्रत्येक राजकीय पक्षाने आपली मानसिकता बनविली पाहिजे की, आपण खरोखरच महिलांच्या आरक्षणाच्या बाजूने आहोत का?याचा पुरेपूर विचार करून प्रथम प्रत्येकांनी (पक्षांनी) आपल्या पक्षामार्फत तत्परता दाखवुन ३३ टक्के किंवा ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारी महिलांना उमेदवारी देऊन नवीन इतिहास घडवायला हवा.नंतर कायद्याच्या चाकोरीतून लोकसभेत विधेयक पारित करण्यासाठी प्रयत्न करावेत. म्हणजेच प्रत्येक पक्षांनी स्वतः पासून सुरूवात करावी नंतर कायद्याच्या किंवा विधेयकाच्या मार्फत बाजू मांडावी असे मला वाटते.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## परंपरा भेंडवळ घटमांडणीची

प्रत्येक प्रदेशाच्या काही प्रथा असतात, काही परंपरा असतात. तशी विदर्भात एक परंपरा आहे. तिला म्हणतात, 'घटमांडणी'. बुलडाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यात, पूर्णा नदीच्या काठावर भेंडवळ नावाच्या छोट्याशा गावात होते म्हणून तिला 'भेंडवळची घटमांडणी' म्हणतात. हवामानाचा अचूक अंदाज वर्तविणारी 'डॉपलर रडार'सारखी अद्ययावत यंत्रणा आजघडीला उपलब्ध आहे. जेव्हा हे काहीच नव्हते, त्याच्या किती तरी आधीपासून घटमांडणी शेतकऱ्यांना हवामानाचा 'मूड' सांगते. पिकांचे आरोग्य सांगते आणि पाऊस-पाण्याचा अंदाज देते. त्यांनी केलेल्या भाकितांपैकी सगळीच बरोबर नसतात आणि सगळी चूकदेखील नसतात. काही जण या प्रकाराला बुवाबाजी म्हणतात. अंधश्रद्धा निर्मूलन समिती त्यास भंपकबाजी म्हणते. या टीकेवर व्यक्त न होता, गावकरी श्रद्धेने एकत्र येतात. चंद्रभान महाराज वाघांचे वंशज ठरल्यानुसार घटांची मांडणी करतात. रात्रभरात तिथे झालेल्या बदलावरून काही निष्कर्ष ठरवितात आणि त्यावर भाष्य करतात. त्याला पंचक्रोशीतील लोक मनोभावे उपस्थित असतात. अनेक लोक तेथील भाकिताची वाट बघत असतात.

अक्षय्य तृतीयेला सूर्यास्तापूर्वी शेतात फुटभर खोल खड्डा खणला जातो. त्यातून मातीची चार ढेकळे बाहेर काढली जातात. त्यांना पावसाच्या चार महिन्यांचे प्रतीक म्हणून संबोधले जाते. पहिले ढेकूळ जून, दुसरे जुलै, तिसरे ऑगस्ट तर चौथे सप्टेंबर. या चार ढेकळांवर पाण्याने भरलेली घागर म्हणजे मातीचे भांडे ठेवले जाते. त्यावर भजे, वडे, करंजी, पापड, कुरडई, सांडई असे पदार्थ ठेवले जातात. या घटापासून काही अंतरावर १८ प्रकारची धान्ये ठेवली जातात. त्यात ज्वारी, गहू, तांदूळ, तूर, मूग, उडीद, तीळ, बाजरी, मटकी, जवस, वटाणा, हरभरा, अंबाडी आदींचा समावेश असतो. घटाच्याच शेजारी पानाचा विडा ठेवला जातो आणि त्यावर सुपारी ठेवलेली असते.

रात्रभर घट तसाच ठेवलेला असतो. दुसऱ्या दिवशी पहाटे गावकरी मंडळी तिथे येतात. ते घटाचे निरीक्षण करतात. जे जे बदल झालेले आढळतात त्याचे नीट अवलोकन करून ते अंदाज वर्तवितात. अठरा धान्यापैकी काही धान्यांची स्थिती कालच्या तुलनेत बदलली असेल, तर त्या धान्याची स्थिती बदलल्याने काय परिणाम होतील याबाबत सांगितले जाते. घटातील पाणी कोणत्या क्रमांकाच्या ढेकळावर किती पडले त्यावरून कोणत्या महिन्यात किती पाऊस होईल याचा अंदाज वर्तविला जातो.

विड्याचे पान म्हणजे देश आणि सुपारी म्हणजे राजा मानले जाते. सुपारी आहे तशीच राहिली तर राजा सुरक्षित असेल असे सांगितले जाते. पानात काही बदल झाला तर देशाची स्थिती कशी असेल याबाबत भाकीत वर्तविले जाते. यावर्षीच्या अंदाजानुसार, राजाला काहीही धोका होणार नाही, मात्र तो तणावात असेल. युद्धजन्य परिस्थिती असल्याने पृथ्वीला धोका असेल आणि आर्थिक स्थिती नाजूक असेल.

ढेकळांवर सांडलेल्या पाण्यानुसार जून महिन्यात पाऊस लहरी स्वरूपाचा असेल. जुलैमध्ये चांगला आणि ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये अवकाळी स्वरूपाचा असेल. रोगराईचे प्रतीक समजले जाणारे धान्य जास्त विखुरलेले दिसल्याने माणसांवर, गुराढोरांवर आणि पिकांवर रोगराईचे सावट असण्याची शक्यता वर्तविली गेली. मंदीच्या सावटाखाली असणाऱ्या कापसाचे उत्पादन चांगले असेल, भावही उत्तम असेल, ज्वारीला भाव मिळेल असा आशादायी निष्कर्ष मांडताना तुरीचे उत्पादन सर्वसाधारण, तर उडदाला मंदीचा सामना करावा लागेल असे त्यांना वाटते.

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या साह्याने हवामानाचा अचूक अंदाज वर्तविणे शक्य असतानाच्या आजच्या काळात घटमांडणीद्वारे भाकीत वर्तविण्याकडे केवळ एक परंपरा म्हणून पाहता येईल. परंपरा मानणारे या भाकितावर विश्वास ठेवत असले, तरी त्यांच्यात विज्ञानाचा जागर करण्याची, तर विज्ञाननिष्ठांनी, सुमारे साडेतीनशे वर्षे सुरू असलेल्या या परंपरेकडे समाजवर्तनाचा भाग म्हणून पाहण्याची गरज आहे.

**- अतुल पांडे**

## मॅट्रिमोनी

मॅट्रिमोनी साईटवर
माहिती देतात फेक
काय सत्य ना कळे
कुणीकरे फेकाफेक

काही सतर्क साईट
करतात सगळे चेक
फुटूनि जातात फुगे
मिळताअनुदानचेक

ए आय निर्मित चित्रे
अपलोड करे अनेक
प्रत्यक्षा हूनि भ्रामक
आवडी गोष्टी प्रत्येक

चांगल्या गुणविशेषा
चढता दिसो आलेख
अवगुणांचा मात्र का
टाळूनदेतात उल्लेख

वरलिया अंगा भुलले
इथेचं खरी असे मेख
घाईच्या या निर्णयाले
सगळेच वाटते सुरेख

नंतर उशीराने कळते
केली कशी धूळफेक
सुरू होई अस्वस्थता
जाणवूलागे प्रतिलेख

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# विकासकामांना गती द्या; प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा -पालकमंत्री मेघना बोर्डीकर

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२३, जिंतूर :** सेलू व जिंतूर तालुक्यांतील विविध विकासकामांचा आढावा घेताना पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देत विकासकामांना गती देण्याचे आदेश दिले. लोकहिताच्या कामांमध्ये कोणताही विलंब सहन केला जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.जिंतूर येथील बोर्डीकर-पोदार इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित या बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्षा लता वाकळे, नगराध्यक्ष प्रताप देशमुख, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, सहायक पोलीस अधीक्षक जीवन बेनीवाल, उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.




बैठकीत नगर परिषद क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, घरकुल योजना, एसटीपी प्रकल्प, क्रीडांगणांची उभारणी, तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीतील धान्य वितरण या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यासोबतच शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमितीकरण व एनएच-६१ (पारवा ते आसोला) बाह्यवळण रस्त्याच्या भूसंपादन प्रक्रियेचाही आढावा घेण्यात आला.महसूल विभागाच्या कामांवर विशेष भर देत पाणंद व शेतरस्त्यांची स्थिती, महाराजस्व अभियान, टंचाई परिस्थिती, संजय गांधी निराधार योजनेतील प्रलंबित प्रकरणे आणि मान्सूनपूर्व तयारी याबाबत माहिती घेण्यात आली. 'लाडकी बहिण' व 'लखपती दीदी' योजनांची अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांपर्यंत पोहोच यावरही चर्चा झाली.यावेळी पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश देताना सांगितले की, पाणीटंचाई व्यवस्थापनाला प्राधान्य देऊन सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत.

शासकीय योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पारदर्शक पद्धतीने पोहोचवावा. तसेच भूसंपादन व अतिक्रमण विषयात नियमांचे काटेकोर पालन करावे. सर्व विभागांनी समन्वय साधून कामांची गुणवत्ता राखत ती वेळेत पूर्ण करावीत आणि नागरिकांच्या तक्रारींना त्वरित प्रतिसाद द्यावा, असेही त्यांनी नमूद केले. विकासकामांचा थेट परिणाम नागरिकांच्या जीवनमानावर होत असल्याने प्रत्येक काम जबाबदारीने पूर्ण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# जे पश्चिम बंगाल, तामिळनाडूला जमते... ते आपणास का जमू नये?

पश्चिम बंगालमध्ये गुरुवारी एकूण २९४ जागांपैकी १५२ जगावर मतदान झाले. यामध्ये एकूण १६ जिल्हे होते. प्रथमच विक्रमी म्हणजे तब्बल ९१.७८ एवढे मतदान झाले तामिळनाडू मध्ये ८४.२९ एवढे विक्रमी मतदान झाले. या दोन्ही राज्यात मागील काही निवडणुकात सुद्धा विक्रमी मतदान झाले होते.

**पश्चिम बंगाल**
२०१६--- ८२.६६ टक्के
२०२१ -- ८३.१७ टक्के
२०२६ -- ९१.७८

**तामिळनाडू**
२०१६ -- ७४.२६ टक्के
२०२१ -- ७२.७३ टक्के
२०२६-- ८४.२९ टक्के

या दोन्ही राज्यात दरवेळेस विक्रमी मतदानाची नोंद झाल्याची आकडेवारी समोर येत आहे.

महाराष्ट्रात २०२४ साली झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत ६६.०५ % मतदान झाले होते जे १९९५ नंतर सर्वोत्तम आहे. कर्मचाऱ्यांना मतदानासाठी सुट्टी असते सवलती दिल्या जातात. मग मतदान कमी का व्हावे ? या संबंधी लोकजागृती होणे आवश्यक आहे.. महाराष्ट्र हे देशातील सर्वात पुढारलेले राज्य आहे. येथे अर्थव्यस्थेला चालना आहे तरीसुद्धा मतदानाला जेवढ्या प्रमाणात लोक बाहेर पडावयास पाहिजेत तेवढे पडत नाहीत पश्चिम बंगाल किंवा तामिळनाडू मध्ये जेवढ्या सवलती मतदानासाठी दिल्या जातात तेवढ्या महाराष्ट्रासाठी सुद्धा आहेत मग मतदान कमी का ? याबाबत सरकारी पातळीवर विचार मंथन व्हावयास हवे.

**- शांताराम वाघ, पुणे.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पिंपळसजवळ कार-दुचाकीची समोरासमोर धडक; आयटीआय विद्यार्थ्याचा मृत्यू, एक जखमी



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२४, विंचूर (नाशिक) :** नाशिक - छत्रपती संभाजीनगर महामार्गावर पिंपळसजवळ कार आणि दुचाकीच्या समोरासमोर झालेल्या भीषण अपघातात निफाड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील १७ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाला, तर त्याचा सहाध्यायी गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

गुरुवार दि.२३ रोजी दुपारी सुमारे अडीच वाजेच्या सुमारास चांदोरी येथून निफाडकडे मोटारसायकलने येत असताना पियुष प्रताप गायकवाड (वय १७) आणि त्याचा मित्र भोर (पूर्ण नाव समजू शकले नाही) हे दोघे मोटारसायकल (क्र. एम.एच १५ के.एफ १७८९) वरून निफाड येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे येत होते.

दरम्यान, पिंपळसजवळ समोरून येणाऱ्या नेक्सॉन कार (क्र.एम.एच १५ एस.सी ८५०९) आणि मोटारसायकलची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात दोघेही विद्यार्थी गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारासाठी नेत असतानाच पियुषचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर जखमी विद्यार्थ्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मृत पियुष हा निफाड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत फिटर ट्रेडचे शिक्षण घेत होता. त्याच्या पश्चात आई - वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे. या घटनेमुळे चांदोरी परिसरासह आयटीआयमध्ये हळहळ व दुःखद वातावरण.

## दैवी शक्तीच्या नावाखाली महिलेवर अत्याचार !

### निफाडमधील भोंदू महेशगिरीवर बलात्काराचा गुन्हा दाखल

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२४, विंचूर (नाशिक) :** दैवी शक्तीचा आणि अंगातील 'करणी' काढण्याचा बनाव रचून एका २८ वर्षीय महिलेचे लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार निफाड तालुक्यातील धारणगाव (खडक) येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी स्वयंघोषित भोंदू महाराज महेशगिरी ऊर्फ महेश दिलीप काकडे (वय ३१) याच्याविरुद्ध लासलगाव पोलीस ठाण्यात बलात्कार आणि जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**नेमकी घटना काय?**

नाशिक येथील रहिवासी असलेली पीडित महिला घरगुती तणाव आणि वैवाहिक अडचणींमुळे मानसिकदृष्ट्या खचलेली होती. याचाच फायदा घेत तिच्या पालकांनी तिला ऑगस्ट २०२४ मध्ये धारणगाव येथील 'प्रतिगाणगापूर' मठात नेले. तेथे महेशगिरी याने महिलेच्या अंगात करणीबाधा असल्याचे सांगून तिला भीती घातली. त्यानंतर तिचा मोबाईल क्रमांक मिळवून तिला अश्लील मेसेज पाठवण्यास सुरुवात केली.

२३ ऑगस्ट २०२४ रोजी, आरोपीने पीडितेला त्र्यंबकेश्वर रोडवरील एका लॉजवर नेले. माझ्याकडे दैवी शक्ती आहे, तू मला विरोध करू शकणार नाहीस, अशी धमकी देऊन त्याने तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला. तसेच तिचे विवस्त्र फोटो काढून कुणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली.

**'अंनिस'च्या पाठपुराव्यामुळे तक्रार दाखल...**

आरोपीचा राजकीय प्रभाव आणि दहशतीमुळे पीडित महिला तक्रार करण्यास घाबरत होती. मात्र, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) पदाधिकाऱ्यांनी पीडितेला धीर दिल्यानंतर तिने लासलगाव पोलीस ठाण्यात धाव घेतली. सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने गुन्हा दाखल केला आहे.

**शासकीय निधी आणि राजकीय वरदहस्त**

या प्रकरणाला आता राजकीय वळणही मिळाले आहे. अंनिसचे राज्य प्रधान सचिव डॉ. टी. आर. गोराणे यांनी गंभीर आरोप केला आहे की, भोंदू महेशगिरी याच्या आश्रमात चक्क शासकीय खर्चाने विविध कामे करण्यात आली आहेत. या कामांच्या मोबदल्यात हा भोंदू संबंधित राजकीय नेत्याचा प्रचार करत असे. अशा प्रकारे राजाश्रय मिळाल्यामुळेच या भोंदूचे धाडस वाढले असून सामान्य जनतेची लूट आणि शोषण होत आहे.

**महत्वाची कारवाई :**

**आरोपी :** महेशगिरी ऊर्फ महेश दिलीप काकडे.

**कलम :** भारतीय न्याय संहिता (BNS) बलात्काराचे कलम आणि महाराष्ट्र नरबळी व अघोरी प्रथा प्रतिबंधक कायदा २०१३.

**मार्गदर्शन :** डॉ. टी. आर. गोराणे, कृष्णा चांदगुडे, कोमल वर्दे, ॲड. स्वाती तेलगोटे.

**आवाहन :**

या भोंदूने अशाच प्रकारे इतरही महिलांचे शोषण केले असण्याची शक्यता आहे. अशा पीडित महिलांनी न घाबरता पुढे येऊन तक्रार नोंदवावी.

**- महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती**

## सुंदरबाई बोधनकर यांचे दुःखद निधन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, कुंडलवाडी :** येथील ज्येष्ठ महिला श्रीमती सुंदरबाई माधवराव बोधनकर (वय ८६ वर्षे) यांचे आज दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३.०५ वाजता दुःखद निधन झाले.

शांत, प्रेमळ व धार्मिक वृत्तीच्या सुंदरबाई यांनी आयुष्यभर कुटुंब एकत्र ठेवत सर्वांना मार्गदर्शन केले. त्या कुंडलेश्वर दूध डेरीचे माजी चेअरमन कै. माधवराव बोधनकर यांच्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंडे तसेच पणतू असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने बोधनकर कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना व्यक्त करण्यात येत आहे.

त्यांचा अंत्यविधी शनिवार, दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वैकुंठ धाम, कुंडलवाडी येथे होणार आहे.त्या राजेश बोधनकर यांच्या आई तर डॉ. नरेश बोधनकर यांच्या आजी आहेत.

## १३ वर्षांच्या शाळकरी मुलीवर मातृत्त्व लादणाऱ्या आरोपीस २० वर्षे सक्तमजुरी, लाख रुपये दंड

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, नवी मुंबई :** चिपळूण तालुक्यातील एका १३ वर्षांच्या शाळकरी मुलीवर बलात्कार करून जीवे ठार मारण्याची धमकी देणारा आरोपी वैभव सुरेश पालशेतकर (वय ३७ वर्षे, राहणार चिपळूण) याला चिपळूण येथील विशेष न्यायालयाच्या जिल्हा न्यायाधीश डॉ. अनिता एस. नेवसे यांनी २० वर्षे सक्तमजुरी व १ लाख रुपये दंडाची शिक्षा आज सुनावली.



आरोपी वैभव पालशेतकर याने मार्च २०१९ मध्ये संध्याकाळी ६ वाजताच्या सुमारास गावात साखर आणण्यासाठी जात असलेल्या शाळकरी मुलीला निर्जन पुलावर अडविले. आरोपीने तिचा हात पकडून तिला जबरदस्तीने बाजुच्या गवतात घेवून गेला. त्याठिकाणी त्याने तिचे तोंड दाबून तिच्यावर बलात्कार केला. तसेच बलात्कार करुन झाल्यानंतर ही घटना कोणालाही सांगितल्यास तिला मारुन टाकण्याची धमकी दिली. भीतीपोटी दुर्दैवी मुलीने ही घटना कोणालाच सांगितली नाही. परंतु, जुलै २०१९ मध्ये पीडित मुलीस तिच्या आईने मुलीची तब्येत जाड वाटत असल्याने चिपळूण येथील हॉस्पीटलमध्ये तपासणीसाठी नेले. तेथील डॉक्टरांनी मुलीची सोनोग्राफी करावी लागेल, असे सांगितले.

पीडित मुलीला तिच्या आईने अश्विनी हॉस्पीटल मुंबई येथे नेले. सोनोग्राफीमध्ये पीडित मुलगी १९ आठवड्याची गरोदर आढळून आली. पीडितेच्या आईने पीडित मुलीस विश्वासात घेऊन विचारणा केली असता, तिने आरोपी वैभव पालशेतकर यांने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना सांगितली.

पीडितेच्या आईने तात्काळ कफ परेड पोलीस ठाणे मुंबई येथे तक्रार दिली. परंतु, गुन्हा चिपळूण पोलीस ठाणे च्या हद्दीत घडलेला असल्यामुळे तो चिपळूण पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. त्यानंतर चिपळूण पोलीसांनी सखोल तपास करुन आरोपी विरुद्ध भा.द.वि. कलम ३७६ (३), ५०६ तसेच पोक्सो कायदा कलम ४, ६, ८, १२ अन्वये चिपळुण येथील विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

खटल्याची सुनावणी चिपळूण येथील विशेष न्यायाधीश डॉ. अनिता एस. नेवसे यांच्यासमोर सुरु झाली. गुन्हा शाबीत करण्यासाठी विशेष सरकारी अभियोक्ता अनुपमा ठाकुर यांनी सरकार पक्षातर्फे एकूण १४ साक्षीदारांची महत्त्वपूर्ण साक्ष अभिलेखावर आणली. त्या अनुषंगाने प्रभावी युक्तीवाद केला.

पुराव्याअंती विशेष न्यायाधीश डॉ. अनिता नेवसे यांनी सरकार पक्षाचा पुरावा ग्राह्य धरुन १३ वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर मातृत्त्व लादणारा नराधम आरोपी वैभव पालशेतकर याला भा.द.वि. कलम ३७६ (३), ५०६ पोक्सो कायदा कलम ४, ६, ८,१२ अन्वये दोषी ठरवून २० वर्ष सक्तमजुरी व १ लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

दंड न भरल्यास १ वर्षाच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. दंडाची रक्कम पीडितेला नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेश केले. या निकालामुळे दुर्दैवी मुलीच्या आईने न्याय मिळाल्याबद्दल भावना व्यक्त केली. हा निकाल म्हणजे समाजातील घृणास्पद गुन्हे करणाऱ्या आरोपींना बसलेली चपराक आहे, अशी प्रतिक्रिया सर्व स्तरावर व्यक्त होत आहे.

सरकार पक्षाच्यावतीने विशेष सरकारी अभियोक्ता अनुपमा ठाकूर यांनी काम पाहिले. तसेच पैरवी अधिकारी म्हणून पोलीस हेड कॉस्टेबल विनायक चव्हाण यांनी काम पाहिले. गुन्ह्याचे तपास काम कफ परेड पोलीस ठाणे येथील सहायक पोलीस निरीक्षक वर्षा शिंदे यांनी केले होते. विशेष न्यायाधीश डॉ. नेवसे यांनी दिलेल्या निकालामुळे महिला व शाळकरी मुलींवर वाढलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांना आळा बसेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

## राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेसाठी मुंबई संघ रवाना

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२४, मुंबई :** भारतीय डॉजबॉल महासंघाच्या मान्यतेने व कर्नाटक राज्य असोसिएशनच्या वतीने १८वी ज्युनियर राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धा दिनांक २३ ते २६ एप्रिल २०२६ या कालावधीत बेलगावी,कर्नाटक येथे आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मुंबई ज्युनियर मुलं व मुलींचा संघ दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथून रवाना होणार आहे.सदर स्पर्धेसाठी मुंबई संघाची अंतिम घोषणा करण्यात आली असून,निवड चाचणी व सराव शिबिरातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची अंतिम १२ सदस्यीय संघात निवड करण्यात आली आहे.

**मुंबई मुलींचा संघ :**

हृदया सुर्वे, सारा सावंत, नेत्रा कंसारा, दुर्वा डापले, हेमांक्षी बामणे, अन्वी बुरीचा, गौरी खोत, दाक्षी थोरात, आस्था शिंगाडे, कृषिका शाह, निश्रा झावेरी, वेदिका शाह.

**मुंबई मुलांचा संघ :**

वेदांत फडतरे, समर्थ कदम, राज बधी, भार्गव पंचाल, जयसिंग परमार, चैतन्य आचार्य, शौर्य तांडुलकर, कृष्णा कोंडल, संप्रीत पुजारी, दिव्यम गोलांबरे, श्रीश नायर.


मुंबई संघाला निरोप देताना मुंबई डॉजबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद दादा प्रभू, ऐश्वर्याताई शेटे, जगदीश अंचन, माला मॅडम तसेच आंतरराष्ट्रीय डॉजबॉल खेळाडू नरेश राऊत , विनायक देवकर, श्लोक अंचन आदी मान्यवरांनी खेळाडूंना मनःपूर्वक शुभेच्छा देत उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रेरित केले.

आंतरराष्ट्रीय डॉजबॉल खेळाडू नरेश राऊत यांनी मुंबई संघाकडून या स्पर्धेत दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## अवघ्या बारा तासात बंद दुकानफोडीचा गुन्हा उघड; तीन आरोपींच्या अटकेसह मुद्देमाल जप्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, बल्लारपूर (चंद्रपूर) :** शहरातील बामणी परिसरात घडलेल्या बंद हार्डवेअर दुकान फोडीच्या गंभीर गुन्ह्याचा छडा लावत स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर पथकाने अवघ्या १२ तासांत मोठी कामगिरी बजावली आहे. या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आली असून चोरीस गेलेला सुमारे ९७ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे देवांशू नरेंद्र धुर्वे रा. महाराणा प्रताप वॉर्ड, बल्लारपूर, अफरोज खान फिरोज खान पठाण रा. साईबाबा वॉर्ड, बल्लारपूर व रोहित किसन धुंडेले रा. फुलसिंग नाईक वॉर्ड, बल्लारपूर अशी आहेत. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन



बल्लारपूर येथे अपराध क्रमांक ५००/२६ अन्वये बीएनएस कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ), ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला होता.

गुन्हा दाखल होताच पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजचा बारकाईने अभ्यास करत तपासाची चक्रे वेगाने फिरवली. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पथकाने तात्काळ कारवाई करत २३ एप्रिल रोजी रात्री आरोपींना अटक केली.

सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वाखाली सपोनि दिपक कांक्रेडवार, पोहवा. किशोर वैरागडे, पोलीस अंमलदार गोपीनाथ नरोटे, शेखर माथनकर व चापोअं. ऋषभ बारसिंगे यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. विशेष म्हणजे पोलिसांनी आरोपींकडून चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रेमशाह सयाम करीत आहेत.

## कोंढा ग्रामस्थांकडून आमदार करण देवतळे यांचा सत्कार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, भद्रावती (चंद्रपूर) :** आमदार करण देवतळे वरोरा विधानसभा यांच्या माध्यमातून तसेच शामसुंदर उरकुडे भाजप तालुका अध्यक्ष, भद्रावती ग्रामीण यांच्या पुढाकाराने कबड्डी खेळासाठी आवश्यक मॅट साहित्य सामाजिक दायित्व निधी डब्ल्यू सी.एल माजरी मार्फत कोंढा येथील क्रीडा मंडळ यांना उपलब्ध करून देण्यात आले.

ग्रामीण भागात क्रीडा सुविधा निर्माण व्हाव्यात आणि युवकांना खेळासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कबड्डी हा ग्रामीण भागातील अत्यंत लोकप्रिय खेळ असून, नव्याने उपलब्ध झालेल्या मॅटमुळे खेळाडूंना अधिक सुरक्षित आणि दर्जेदार वातावरणात सराव व स्पर्धा खेळण्याची संधी मिळणार आहे. या उपक्रमाबद्दल कोंढा ग्रामस्थांच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अक्षय नागपुरे, शंकर मडावी, पांडुरंग निब्रड, आनंद राजुरकर, विनोद नागपुरे, विशाल गोंडे यांच्यासह ग्रामस्थ व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या मदतीतून दिव्यांग महिलेला मिळाले नवजीवन!

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** संघर्षमय आयुष्यात एखाद्या क्षणी मिळालेला आधार हा केवळ मदत नसून नवजीवनाची सुरुवात ठरतो, याची जिवंत अनुभूती बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील दिव्यांग महिला पुष्पा अशोक खैरकर यांच्या आयुष्यात नुकतीच आली. त्यांच्या हालचालींना आलेल्या मर्यादांमुळे दैनंदिन जीवन अत्यंत कठीण झाले असताना, आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या संवेदनशीलतेतून दिलेल्या व्हीलचेअरच्या मदतीने त्यांच्या आयुष्यात आशेची नवी किरण फुलली आणि माणुसकीचा स्पर्श पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.



पुष्पा अशोक खैरकर यांच्या मुलीने आईसाठी व्हीलचेअरची मागणी केली होती. ही मागणी केवळ एक साधन मिळवण्यासाठी नव्हती, तर आईला स्वाभिमानाने आणि सन्मानाने जगता यावे, या भावनेतून केलेली एक आर्त हाक होती. या भावनांची दखल घेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत मदतीचे आश्वासन दिले.आपला शब्द पाळत २२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी चार वाजता पुष्पा खैरकर यांना व्हीलचेअर प्रदान करण्यात आली.

या प्रसंगी खैरकर कुटुंबीयांच्या त्यांच्या डोळ्यांत दाटलेले आनंदाश्रू आणि चेहऱ्यावर उमटलेला दिलासा हा उपस्थित प्रत्येकाच्या मनाला स्पर्शून गेला. ही मदत त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाची ठरली असून आता त्यांना दैनंदिन जीवन अधिक सुलभ होणार आहे. या प्रसंगी किशोर पंदीलवार, गजानन पाटणकर, सुरज टोमते, रमेश लीगमपल्लीवार, सुरेख इटनकर, योगिता ढेंगरे आणि नीता डाखोरे यांची उपस्थिती होती.

आ. सुधीर मुनगंटीवार हे नेहमीच कष्टकरी, शेतकरी, महिला, गरजू आणि दिव्यांग बांधवांसाठी विविध माध्यमांतून मदतीचा हात पुढे करत असतात. त्यांच्या या सातत्यपूर्ण कार्यामुळे समाजात त्यांच्याविषयी आदर आणि विश्वास निर्माण झाला असून अनेक लोकप्रतिनिधी त्यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवत आहेत. ही घटना केवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित नसून समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून केलेली मदत आहे.एखाद्याच्या आयुष्यात दिलेला छोटासा आधारही किती मोठा बदल घडवू शकतो, याची जाणीव करून देणारी ही हृदयस्पर्शी घटना आहे.

# कान्हड - आडगाव दराडे येथे गायरान जमिनीवर मुरूम

## माफियांचा कहर; २५ एकर क्षेत्रातील उत्खननामुळे प्रशासनावर प्रश्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, सेलू (परभणी) :** सेलू तालुक्यातील कान्हड - आडगाव दराडे शिवारात शासनाच्या गायरान जमिनीवर सुरू असलेल्या बेकायदेशीर मुरूम उत्खननामुळे परिसरात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मागील काही महिन्यांपासून सुरू असलेल्या या प्रकारामुळे स्थानिक नागरिकामध्ये अस्वस्थता पसरली असून, प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर ही प्रश्न उपस्थित होत आहेत.स्थानिकांच्या माहितीनुसार, कोणतीही अधिकृत परवानगी न घेता काही मुरूम माफियांनी मोठ्या प्रमाणावर उत्खनन सुरू ठेवले आहे. दिवस-रात्र सुरू असलेल्या या कामातून मोठ्या प्रमाणावर मुरूम बाहेर काढून त्याची विक्री केली जात असल्याचे सांगितले जात आहे.या



प्रकरणात सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे या माफियांना छोट्या-मोठ्या राजकीय नेत्यांचा पाठिंबा असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळेच संबंधितांकडून कोणतीही भीती न बाळगता उघडपणे उत्खनन सुरू असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये रंगत आहे. तथापि, या बाबत अधिकृत स्तरावर कोणतीही पुष्टी झालेली नाही.

अंदाजे २० ते २५ एकर गायरान जमिनीतील मुरूम उपसून काढण्यात आल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले असून, पर्यावरणीय समतोलही बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जमिनीची धूप, पाण्याची पातळी घटणे यासारखे परिणाम भविष्यात जाणवू शकतात, अशी चिंता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जाते.दरम्यान, या बेकायदेशीर उत्खननाविरोधात आवाज उठवणाऱ्या काही सामाजिक कार्यकर्त्यांवर दबाव टाकण्याचे प्रयत्न होत असल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी तहसील प्रशासनाकडे निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. उत्खनन त्वरित थांबवणे, संबंधितांवर गुन्हे दाखल करणे, तसेच गायरान जमिनीचे संरक्षण करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे, या मागण्या करण्यात आल्या आहेत. प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन तातडीने कारवाई करावी, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. आता या प्रकरणावर प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण परभणी जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# मुंबई येथे नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत संवर्धित शेतीसाठी संशोधन करार संपन्न

## जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढीसाठी संवर्धित शेती संशोधनाला गती

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२४, राहुरी (अहिल्यानगर) :** हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात एक मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. महाराष्ट्रातील प्रमुख पीक पद्धतींमध्ये संवर्धित शेतीला चालना देण्याच्या उद्देशाने भारतीय मृदा विज्ञान संस्था, भोपाळ, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या सहकार्याने प्रकल्पातील २१ जिल्ह्यांमध्ये पुढील तीन वर्षांकरिता संशोधन हाती घेण्यात येणार आहे. या विषयीचे सामंजस्य करार लोकभवन, मुंबई येथे करण्यात आले. याप्रसंगी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प संचालिका श्रीमती मिनल करणवाल, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मनी, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, भारतीय मृदा विज्ञान संस्थेचे डॉ.नरेंद्र कुमार लेंका, प्रकल्पाचे कृषिविद्या तथा मृदाविज्ञान विशेषज्ञ डॉ. विजय कोळेकर, सर्व कृषी विद्यापीठांचे संचालक संशोधन, मृदविज्ञान विभाग प्रमुख व इतर प्रकल्प अधिकारी उपस्थित होते.



जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढविण्याचा सर्वात शाश्वत मार्ग म्हणून शून्य मशागत-संवर्धित शेतीपद्धतीकडे जगातील अनेक देश वळत आहेत. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात २०१९ ते २०२४ या काळात शेतीशाळा घेऊन शून्य मशागत तंत्राचा प्रसार केला असून मराठवाडा-विदर्भात कापूस, सोयाबीन, मका, तूर, हरभरा या प्रमुख पिकांचे अनेक शेतकरी जमिनीची नांगरणी न करता शून्य मशागत पद्धतीने चांगले उत्पादन घेत असल्याचे दिसून आले आहे.

या पद्धतीने शेतकऱ्यांना उत्पादन वाढीबरोबरच उत्पादन खर्चामध्ये मोठी बचत आणि मातीच्या गुणधर्मांमध्ये लक्षणीय सुधारणा झाल्याचे आढळून आलेले आहे. परंतु या पिकांसाठी कृषी विद्यापीठाकडून शून्य मशागत पद्धतीसाठी शिफारस नसल्याचे लक्षात आले आहे. त्यामुळे सदर प्रकल्पांतर्गत याविषयी संशोधन प्रकल्प राबविण्याचे निश्चित केले आहे.

मात्र हे संशोधन केवळ विद्यापीठाच्या परिसरात घेण्यात येणार नसून त्याबरोबरच ते शेतकऱ्यांच्या सहभागाने प्रकल्पातील जिल्ह्यांमधील ८४ गावातील निवडक २५२ प्रयोगशील शेतकऱ्यांच्या शेतावर ही राबविण्यात येणार आहे. हे समांतर सहभागीय संशोधन केल्यामुळे शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचविण्यासाठी लागणारा वेळ लक्षणीयरीत्या वाचणार आहे. या संशोधन प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील शेती अधिक हवामान अनुकूल होऊन जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होईल.

# जनगणना २०२७ अंतर्गत १ ते १५ मे दरम्यान नागरिकांना स्वयंगणना करण्याची सुविधा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** 'जनगणना २०२७' चा कार्यक्रम दाहीर झाला असून देशातील ही पहिलीच डिजीटल जनगणना आहे. विशेष म्हणजे पहिल्या टप्प्यात १ मे ते १५ मे या कालावधीत नागरिकांना स्वयंगणना करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. २०११ च्या जनगणनेनंतर तब्बल १५ वर्षांनी ही जनगणना होत असून जनगणनेतील माहितीचा उपयोग देशाच्या विकासाकरीता व योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता उपयुक्त ठरत असते. चंद्रपूर जिल्ह्यात जनगणनेच्या पहिल्या टप्प्याला सुरुवात होत असून नागरिकांना स्वत:ची माहिती स्वत: भरण्यासाठी १ मे ते १५ मे २०२६ या पंधरा दिवसाच्या कालावधीत स्वयंगणनेची विशेष सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

यासाठी नागरिकांनी एसई.सेंसस.जीओवी. इन या अधिकृत वेब पोर्टलवर भेट देऊन आपली माहिती भरावयाची आहे. यात कुटुंब प्रमुखाचे नाव, १० अंकी मोबाईल क्रमांक आदींचा समावेश आहे. या पोर्टलवर विविध भाषांमध्ये माहिती भरण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. माहिती यशस्वीरित्या भरल्यानंतर प्रत्येक कुटुंबाला एक स्वतंत्र ओळखपत्र क्रमांक (आयडी) प्राप्त होईल, जो नागरिकांनी अत्यंत सुरक्षितपणे जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

दुसऱ्या टप्प्यात जेव्हा प्रगणक घर भेटीसाठी येतील, तेव्हा त्यांना हा आयडी दिल्यास प्रगणक तो पोर्टलवर अपलोड करतील आणि नागरिकांची माहिती अधिकृतरित्या जनगणनेत नोंदविली जाईल. यंदाची जनगणना पूर्णपणे डिजीटल स्वरुपात होणार असल्याने माहिती संकलनासाठी विशेष अप्लिकेशनचा वापर केला जाणार आहे.

यामध्ये प्रत्यक्ष कुटुंबाची तसेच घराची सविस्तर माहिती गोळा करण्यासाठी 'ॲप' वापरले जाणार आहे. या अद्यावत प्रक्रियेद्वारे घराची स्थिती, पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छता, आणि मालमत्ता याबद्दलची सखोल माहिती घेतली जाईल. या वेब पोर्टलमध्ये भरलेली नागरिकांची सर्व वैयक्तिक माहिती पूर्णपणे गोपनीय आणि सुरक्षित राहणार आहे.



### जिल्हा प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

जनगणना हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या राष्ट्रीय कार्यात आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा. नागरिकांनी आपल्या वेळेनुसार १ मे ते १५ मे दरम्यान घरबसल्या स्वयंगणना पोर्टलचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. तसेच दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष सर्व्हेक्षणासाठी येणाऱ्या प्रगणकांना सहकार्य करुन आपल्या कुटुंबाची अचूक आणि परिपूर्ण माहिती द्यावी, असे आवाहन चंद्रपूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# रिक्षा टॅक्सी चालकांना मराठी भाषा शिकवणार : परिवहन मंत्री

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, मुंबई :** रिक्षा, टॅक्सी तसेच ई-बाईक टॅक्सी सेवांमधील व्यावसायिक वाहनचालकांना प्रवाशांशी मराठीतून संवाद साधता यावा, यासाठी मुंबई मराठी साहित्य संघ आणि कोकण मराठी साहित्य परिषदेशी निगडीत साहित्यिकांनी चालकांना व्यावहारिक मराठी शिकवण्यासाठी पुढाकार घेण्याची तयारी दर्शविली आहे. त्यासाठी आवश्यक अभ्यासक्रम लवकरच तयार करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

परिवहन मंत्री सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयीन दालनात यासंदर्भात बैठक झाली. बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, मराठी भाषा विभागाचे उपसचिव नामदेव भोसले, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. शामकांत देवरे तसेच तज्ज्ञ, साहित्यिक उपस्थित होते.

वाहनचालकांना खेळीमेळीच्या वातावरणात व्यावहारिक मराठी शिकविण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषद आपल्या ७२ शाखांमधून शिकवणी वर्ग सुरू करण्याची तयारी दर्शवित आहे. तसेच, मुंबई मराठी साहित्य संघाने आपल्या स्वयंसेवी शिक्षकांच्या माध्यमातून ऑनलाईन मराठी भाषा प्रशिक्षण देण्याची तयारी दर्शविली आहे. या प्रशिक्षणासाठी चालकांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, असे परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

'महाराष्ट्र दिना'चे औचित्य साधत संपूर्ण राज्यभर रिक्षा व टॅक्सी चालकांच्या परवान्यांची तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान इतर नियमांसोबतच चालकांना मराठी भाषेचे व्यवहारज्ञान आहे की नाही, याचीही पडताळणी केली जाणार आहे. वाहनचालकांमध्ये मराठी भाषेबद्दल आत्मीयता निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या अध्यक्षा उज्ज्वला मेहेंदळे तसेच ज्येष्ठ साहित्यिक महेश केळुसकर, संतोष राणे, अशोक बागवे, बाळ कांदळकर, सुनील तांबे, शिवाजी गावडे, सतीश सोळांकुरकर, अरुण म्हात्रे, एकनाथ आव्हाड, प्रसाद कुलकर्णी, प्राचार्य अशोक चिटणीस, ज्येष्ठ साहित्यिका अनुपमा उजगरे, दीपा ठाणेकर आणि मनीषा राजपूत आदींच्या मार्गदर्शनामुळे चालकांना मराठी भाषेचे व्यवहारज्ञान मोहिमेला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा परिवहन मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केली.

# थोडक्यात

## नंदिनी घणघाव हिची दहावी CBSE परीक्षेत झेपदार कामगिरी

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२४, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील आस्नोली गावचे भूमिपुत्र सध्या ज्ञानदीप विद्यालय गेगांव नांदवळ येथे सहशिक्षक असलेले अविनाश सदाशिव घणघावं यांची कन्या नंदिनी



शुभांगी अविनाश घनघाव हिने सिक्रेट हर्ट हायस्कूल वरपगांव कल्याण या शाळेतून या वर्षीच्या दहावीच्या सीबीएससी परीक्षेत ९६ टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश प्राप्त केले आहे.सध्या ती कल्याण येथे आई वडिलांसमवेत राहत असून सम्पूर्ण शहापूर कल्याण आणि मुरबाड आणि किन्हवली पंचक्रोशीत तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.तिचा यथोचित सत्कार किन्हवली पोलीस स्टेशनचे सपोनि नितीन खैरनार, किन्हवली रिपाई चे अध्यक्ष तसेच पत्रकार किशोर चन्ने, नंदिनी चे काका ॲड. अनिल घणघावं,तिचे वडील अविनाश घणघावं आई शुभांगी घणघावं आजोबा किसन घणघावं व काका किन्हवली युवा रिपाईचे योगेश घणघावं आजी विठाबाई विठाबाई आत्या जयश्री चन्ने, संजना चन्ने, केरूनाथ कशीवले उषा कशीवले, वनिता उबाळे,ग्रामस्थ आस्नोली यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

## कोयना रत्न पुरस्काराने अर्बन बँकेचे व्यवस्थापक कृष्णात शिंदे सन्मानित

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२४, पाटण (सातारा) :** दि.पाटण अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेचे व्यवस्थापक कृष्णत रामू शिंदे यांना कोयना एज्युकेशन सोसायटी संचलित बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेकडून



यावर्षीचा कोयना रत्न पुरस्कार २०२६ देवून नुकताच त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. याबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटणचे माजी विद्यार्थी कृष्णत शिंदे यांनी आपल्या गुणवत्तेच्या व कर्तृत्वाच्या जोरावर शैक्षणिक क्षेत्रात भक्कम पाया रचत पुढे बँकिंग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सध्या पाटण अर्बन बँक व्यवस्थापक म्हणून कार्यरत असताना त्यांनी ग्राहकाभिमुख सेवा, पारदर्शकता आणि विश्वासार्हता निर्माण केली आहे. समाजकार्यातील त्यांचा सक्रिय सहभाग, गरजू घटकांना केलेले सहकार्य आणि प्रामाणिक कार्यपद्धती यामुळे ते परिसरात विशेष लोकप्रिय ठरले आहेत. त्यांच्या या सर्वांगीण कार्याची दखल घेत कोयना एज्युकेशन सोसायटीच्या माजी विद्यार्थी संघाने त्यांना या मानाच्या पुरस्काराने सन्मानित केसे बाळासाहेब देसाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विलास कळंत्रे माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष बाबूराव शेळके यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ.एच.व्ही काटे, प्रा. विनायक माथणे आदीसह मान्यवर व माजी विद्यार्थी उपस्थित होते.कोयना रत्न पुरस्कार २०२६ मिळाल्पाबरल कृष्णत शिंदे यांचे माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, पाटण विधानसभा मतदारसंघाचे भाजप नेते सत्यजितसिंह पाटणकर, भाजप सातारा जिल्हा सरचिटणीस याज्ञसेनसिंह पाटणकर तसेच परिसरातील नागरिकांनी अभिनंदन केले.

## शेतीमालाला भाव नसल्यामुळे एस.आर.पी.टी शेतकऱ्यांना मार्गदर्शक

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२४, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सोयगाव येथील शेतकरांना जळगाव जिल्हा एस.आर.टी.प्रचारक राहुल भाऊ पाटील व परशुराम भाऊदेवरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम राम कलर



दुकानात सोयगाव येथे उत्साहात संपन्न झाला. शेतकरी बांधवांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला. या शेती शाळेत राहुल भाऊ, परशुराम भाऊ यांनी SRT शेतीचे महत्त्व, मातीची सुपीकता, कमी खर्चातील शेती, सेंद्रिय कर्ब वाढ आणि शाश्वत शेती याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी मक्का कापूस या पिकासाठी आपल्या शेतात एस.आर.टी.तंत्रज्ञानाचा वापर करून प्रथमच कापूस पिक घेत एका एकरात उत्पन्न १६ क्विंटल घेतले. कृषीभूषण अरूण सोहणी यांनी या पध्दत तीचे स्वागत करत या पध्दत मूळे तरुण वर्ग शेतीकडे वळेल व अधिक चांगल्या प्रकारे ऊत्पादक घेईले आसे मनोगत व्यक्त केले. प्रदीप चौधरी यांनी सुरू केलेल्या डठढ शेती विषयी सविस्तर माहिती देत, ही पद्धत शेतकऱ्यांसाठी किती फायदेशीर आहे हे पटवून सांगितले. जमीन जिवंत ठेवायची असेल तर SRT स्वीकारणे गरजेचे आहे, हा संदेश त्यांनी दिला. खर्च कमी, उत्पादन चांगले, जमिनीचा पोत सुधारणा आणि नैसर्गिक शेतीकडे वाटचाल या SRT च्या फायद्यांवर विशेष चर्चा झाली. शेतकऱ्यांनीही उत्साहाने सहभाग घेतला.

SRT शेती ही फक्त पद्धत नाही, तर शेतकऱ्यांच्या समृद्धीकडे नेणारी चळवळ आहे, हा विश्वास या शेती शाळेत अधिक मजबूत झाला. अशा मार्गदर्शनातून शेतीत नक्कीच सकारात्मक बदल घडतील. या प्रसंगी भास्कर चौधरी यांनी जलतारा प्रकल्पाचे महत्त्व साधले. शेवटी आभार रघुनाथ काटोले शेतकऱ्यांनी प्रसिद्ध करताना गावातील शेतकरी दत्तू काटोले, बबन परदेशी, राम चौधरी, रमेश गव्हांड, विजय चौधरी, रमेश पाटील, अनिल चौधरी यांनी केले. या कार्यक्रमात गावातील अनेक शेतकऱ्यांनी लाभ घेतला.

## नलिनी नारायण घोरपडे यांचे निधन

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.२४, पुणे :** येरवडा परिसरातील कै.नलिनी नारायण घोरपडे यांचे २३ एप्रिल २०२६ रोजी निधन झाले असून आज त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. त्या प्रेमळ, साध्या व मनमिळाऊ स्वभावामुळे सर्वांच्या आदरास पात्र होत्या. त्यांनी बहुजन समाज पार्टीच्या चळवळीत अनेक वर्ष प्रामाणिकपणे कार्य करत पक्षनिष्ठा जपली व विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेतला.



त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी तसेच नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने मायेची सावली हरपली अशी भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनाबद्दल कार्यकर्ते व स्थानिक नागरिकांकडून शोक व्यक्त करण्यात आला.